


दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro, Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २२६ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२२ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# सरकार आपला एकही शब्द फिरवणार नाही

# शेतकऱ्यांना योग्यवेळी कर्जमाफी मिळेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुन्हा एकवार ग्वाही

पुणे (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पुन्हा एकदा सरकार योग्यवेळी शेतकरी कर्जमाफीचा आपला शब्द पूर्ण करेल अशी ग्वाही दिली. सरकार दिलेला आपला एकही शब्द फिरवणार नाही. शेतकरी कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी घेतला जाईल, असे ते शेतकऱ्यांना आश्वस्त करताना म्हणालेत. यावेळी त्यांनी जगातील पहिल्या ६०० विद्यापीठांत नाव आल्याबद्दल पुणे विद्यापीठाचे कौतुकही केले.देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी येथे आयोजित जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमात सहभाग घेतला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी शेतकरी कर्जमाफीसह पुणे विद्यापीठाची यशस्वी घोडदौड, पालखी सोहळा, शेतकरी समस्या आदी विविध मुद्यांवर भाष्य केले. वारी ही महाराष्ट्राची प्राचीन परंपरा आहे. विठ्ठल दर्शनासाठी लाखो वारकरी पायी चालत येतात. ते सर्वजण आज पुण्यात थांबलेत. आम्ही या कार्यक्रमाशी जोडून आज योगाभ्यास केला. पुण्यातील महाविद्यालय यात सहभागी झाले. भव्य कार्यक्रम झाला. मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. आज त्यांच्यामुळेच योग आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वीकारण्यात आला आहे, असे ते म्हणाले.



### पुणे विद्यापीठाचा पहिल्या ५०० विद्यापीठांत समावेश होईल

पत्रकारांनी त्यांना पुणे विद्यापीठाचा दर्जा वाढला, पण विभागांची स्थिती फारशी चांगली नाही, प्राध्यापकांचाही तुटवडा आहे, असा प्रश्न विचारला. त्यावर ते म्हणाले, सर्वप्रथम मी पुणे विद्यापीठाचे मनापासून अभिनंदन करतो. जगातील पहिल्या ६०० विद्यापीठांत आज पुणे विद्यापीठ आहे. मला अपेक्षा आहे की, पुढील वर्षी किंवा २ वर्षांत पहिल्या ५०० विद्यापीठांत आपली विद्यापीठे असतील.जगातील पहिल्या ५०० विद्यापीठांना मान असतो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची त्या दिशेने वाटचाल सुरू आहे. येथील कुलगुरू व्यवस्थापन परिषद, सिनेटर, प्राध्यापक यांचे कार्य कौतुकास्पद आहे. तुम्ही ज्या तुटवड्याविषयी प्रश्न केला, त्याविषयी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी यापूर्वीच सर्वप्रकारच्या मान्यता दिल्या आहेत.

### आळंदीत कत्तलखाना होणार नाही

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी आळंदीतील कत्तलखान्याच्या प्रश्नावरही भाष्य केले. आळंदीच्या विकास आराखड्यातील एक आरक्षण कत्तलखान्यासाठी दाखवण्यात आले आहे. पण कोणत्याही परिस्थितीत आळंदीत कत्तलखाना करता येणार नाही. मी स्वतः या कत्तलखान्याचे आरक्षण वगळण्याचे आदेश दिलेत. आळंदीत असे कोणतेही कृत्य होणार नाही याची हमी मी वारकरी संप्रदाय व वारकरी नेत्यांना देतो, असे ते म्हणाले.

### सरकार योग्यवेळी कर्जमाफी देणार

सरकार शेतकरी कर्जमाफीचे आपले आश्वासन पूर्ण करणार असल्याचेही त्यांनी यावेळी ठणकावून सांगितले. सरकार दिलेला आपला एकही शब्द फिरवणार नाही. शेतकरी कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी घेतला जाईल, असे ते म्हणाले. फडणवीस पुढे म्हणाले, सरकारचे सांगली व कोल्हापूरमधील पूरस्थितीवर लक्ष आहे. धरणांतून विसर्ग केव्हा सुरू करायचा व केव्हा बंद करायचा याचे नियोजन करण्यात आले आहे. शेजारच्या राज्यांशीही समन्वय ठेवला जात आहे. त्या राज्यांत आपला एक इंजिनिअर बसला आहे. पावसाळ्यात तो तिथेच असतो. त्याच्या माध्यमातून योग्य तो समन्वय साधला जात आहे. अर्थात निसर्गाचा भरवसा देता येत नाही. पण आपण आपल्या बाजूने पूर्ण नियोजन केले आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# धन्यवाद सुधीरभाऊ..! तुमच्यामुळे आमच्या संघर्षाला न्याय मिळाला

## मानधन वाढीनंतर सेनानींच्या डोळ्यांत आनंदाश्रू, टाळ्यांच्या गजरात व्यक्त केली कृतज्ञता

### सुधीरभाऊ नसते तर आमचा लढा विस्मृतीत गेला असता; लोकतंत्र सेनानींचे भावनिक उद्गार

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आम्ही वारंवार प्रयत्न करत होतो, पण आमची कुणी दखलही घेतं नव्हते... त्यामुळे आमचा लढा विस्मृतीत गेला होता... पण सुधीरभाऊंनी आमचं ऐकलं, आमची वेदना समजून घेतली आणि तो आवाज विधानसभेत बुलंद केला. मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणविस सोबत भेटत निवेदन दिले. आज आमच्या संघर्षाला सरकारदरबारी मान्यता मिळाली, यामुळे एक अपूर्णतेची भावना पूर्णत्वाला गेल्यासारखी वाटते,अशा अत्यंत भावनिक शब्दांत लोकतंत्र सेनानींनी माजी वने, सांस्कृतीक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.चंद्रपूर येथील



जनसंपर्क कार्यालयात झालेल्या हृदयस्पर्शी भेटीत सेनानींनी सुधीर मुनगंटीवार यांचा सत्कार केला. २० हजार रुपयांच्या सन्मान निधीबद्दल कॅबिनेट बैठकीत झालेल्या निर्णयानंतर, सेनानींच्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू तरळले.

एक सेनानी म्हणाले,सुधीरभाऊ कायमच गरीब, उपेक्षितांसाठी आवाज उठवत आलेत. आमच्या मागण्या त्यांच्या प्रयत्नांमुळेच सरकारदरबारी पोहोचल्या आणि राज्यभरातील ४ हजार १०३ लोकतंत्र सैनिकांना न्याय मिळाला. सुधीरभाऊमुळे आमचा लढा व्यर्थ गेला नाही याचं आज समाधान वाटतं. या प्रसंगी सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मी केवळ माझं कर्तव्य निभावलं. तुमचा लढा देशासाठी होता, त्यामुळे राज्य सरकारने तुमचा मान राखावा, हे माझं वैचारिक उत्तरदायित्व होतं. उर्वरित मागण्यांसाठीही मी तुमच्यासोबतच उभा राहीन. या घोषणेनंतर उपस्थित सेनानींनी टाळ्यांच्या गजरात सुधीरभाऊ धन्यवाद म्हणत आपल्या भावना व्यक्त केल्या.

# विमान दुर्घटनेनंतर दीपक पाठक यांचे पार्थिव बदलापूरात दाखल

### अपघातानंतर ९व्या दिवशी झाले अंत्यसंस्कार



**बदलापूर । प्रतिनिधी**

अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेले बदलापूरचे रहिवासी आणि एअर इंडियाचे केबिन क्रू मेंबर दीपक पाठक यांचे पार्थिव शनिवारी त्यांच्या राहत्या घरी आणण्यात आले. या वेळी बदलापूरकरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली, तर दीपक यांचा मृतदेह पाहून त्यांच्या कुटुंबीयांनी हृदयद्रावक आक्रोश केला.

१२ जून २०२५ रोजी अहमदाबादहून लंडनला जाण्यासाठी निघालेले एअर इंडियाचे विमान दुर्दैवाने कोसळले होते. या अपघातात केबिन क्रू म्हणून कार्यरत दीपक पाठक यांचाही मृत्यू झाला. डीएनए चाचणीद्वारे मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी मोठा कालावधी लागला, अखेर अपघाताच्या नवव्या दिवशी दीपक यांचा मृतदेह त्यांच्या कुटुंबीयांना सुपूर्द करण्यात आला.

कात्रप परिसरातील त्यांच्या राहत्या घरी दीपक यांचा मृतदेह आणल्यानंतर बदलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली. अंत्यदर्शनानंतर बदलापूरमध्ये शोकाकुल वातावरणात दीपक यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या अंत्ययात्रेत शेकडो नागरिकांसह कुटुंबीय, आप्तेष्ट, मित्रमंडळी आणि शहरातील लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते.

# दुर्दैवी घटना! विजेचा धक्का बसून २१ वर्षीय तरुणीचा मृत्यू

## डागपिंपळगावात शोककळा; कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर

**वैजापूर । प्रतिनिधी**

डागपिंपळगाव येथे शुक्रवारी एक हृदयद्रावक घटना घडली आहे. विजेचा जोरदार धक्का बसून ईशा सचिन पवार (वय २१) या तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. कुटुंबाच्या कर्तव्यात गुंतलेल्या या तरुणीचे अचानक जाणे गावावर शोककळा पसरवणारे ठरले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, ईशा शुक्रवारी दुपारी आपल्या राहत्या घरी काम करत असताना तिला विजेचा जबरदस्त धक्का बसला. कुटुंबीय आणि शेजारी लगेचच धाव घेत तिला तातडीने वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, दुपारी सुमारे १२ वाजता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.घटनेची माहिती मिळताच वीरगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक शंकर वाघमोडे व भालेराव यांनी रुग्णालयात जाऊन पाहणी केली. वैद्यकीय अहवालाच्या आधारे घटनेची वीरगाव पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.ईशाच्या अचानक निधनाने डागपिंपळगाव परिसर शोकमग्न झाला आहे. तरुण आणि कुटुंबाच्या आधारस्तंभासारख्या ईशाचा असा अकाली मृत्यू कुटुंबीयांसाठी दुःखाचा डोंगरच आहे.



गावकऱ्यांनी या दुःखद प्रसंगात कुटुंबीयांच्या पाठीशी उभे राहून सहानुभूती व्यक्त केली आहे.

# एसटी महामंडळाकडून प्रवाशांच्या अडचणींचे तातडीने निराकरण

### २५ जूनला जव्हार आगारात ‘प्रवासी राजा दिन’ व ‘कामगार दिन’ आयोजन

**जव्हार । जितेंद्र मोरघा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या वतीने राज्यभर एसटीद्वारे प्रवासी सेवा दिली जाते. ग्रामीण भागाची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एसटी बससेवेविषयी प्रवाशांच्या अनेक तक्रारी समोर येत असतात. बस वेळेवर न येणे, रस्त्यातच बस खराब होणे अशा विविध अडचणी प्रवासी वारंवार मांडतात.याच समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या उद्देशाने पालघर विभागीय नियंत्रक यांच्या उपस्थितीत २५ जून रोजी जव्हार आगारात ‘प्रवासी राजा दिन’ आणि ‘कामगार दिन’ आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्रवासी व कर्मचारी आपापल्या तक्रारी लेखी स्वरूपात सादर करू शकतात. संबंधित तक्रारींचे तातडीने निवारण करण्याचा प्रयत्न विभागीय नियंत्रकांकडून केला



जाईल, असे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले आहे.

प्रवासी राजा दिनाच्या माध्यमातून प्रवासी आपल्याला येणाऱ्या अडचणी थेट प्रशासनासमोर मांडू शकतात. तर कामगार दिनाच्या निमित्ताने एसटी कर्मचाऱ्यांना आपले व्यक्तिगत आणि संघटनात्मक प्रश्न मांडण्याचीही संधी दिली जाईल. या तक्रारींची शहानिशा करून तातडीने उपाययोजना करण्यात येईल, असे विभागीय नियंत्रकांनी स्पष्ट केले आहे.त्यामुळे २५ जून रोजी जव्हार आगारात आयोजित करण्यात आलेल्या प्रवासी राजा दिन व कामगार दिनात जास्तीत जास्त प्रवासी आणि कर्मचारीवर्गाने सहभागी होऊन आपापल्या समस्या प्रशासनासमोर मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

> एसटी महामंडळाकडून प्रवाशांना सेवा देतांना अनेक वेळा प्रवाशांच्या तक्रारी समोर येतात. या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महामंडळाकडून आयोजित करण्यात आलेल्या ‘प्रवासी राजा दिना’त प्रवाशांनी सहभागी होऊन आपापल्या अडचणी प्रशासनासमोर मांडाव्यात. त्यामुळे समस्यांचा तातडीने निपटारा करण्यात सहकार्य होईल.
> – इमरान कोतवाल, उपाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, पालघर जिल्हा


# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठांत ब्लाकचेन सिस्टमचा वापर

## विद्यार्थी हितासाठी डिजिटलतेकडे वाटचाल



**कधीकाळी मागासलेले विद्यापीठ म्हणून परीचित असलेल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक ने मागील वर्षापासून कात टाकली आहे. विद्यार्थी हितासाठी नवनवीन तंत्रज्ञान वापरून इतर पारंपारिक विद्यापीठांना कितीतरी पटीने मागे सोडले आहे. मागासलेले विद्यापीठ म्हणून समजले जाणारे हे विद्यापीठ आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पारंपरिक विद्यापीठांना पिछाडत पुढे सरकले आहे. या विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.संजीव सोनवणे यांच्या दूरदृष्टीने या विद्यापीठाने प्रगतीकडे वाटचाल सुरू केली आहे. कुलगुरूंची डिजिटल विद्यापीठ म्हणून केलेली वाटचाल वाखाणण्याजोगी आहे.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांचे पदवी प्रमाणपत्र सुरक्षित करण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा अवलंब हा दिनांक २० डिसेंबर २०२३ रोजी आयोजित २९ व्या दीक्षांत समारभापासून करण्यात आला आहे.तसेच या समारंभात ब्लाकचेन आधारित एकूण १,५६,२४० पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. तसेच दि २४ फेब्रुवारी २०२५ आयोजित करण्यात आलेल्या ३० व्या दीक्षांत समारंभातही एकूण १,३९,२१८ विद्यार्थ्यांना ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित पदव्या प्रदान करण्यात आल्या आहेत. मे २०२४ पासून अंतिम परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या एकूण १,१८,००० हजार गुणपत्रकांवर ब्लाकचेन आधारित टठ कोड अंकित करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या इमेलवर गुणपत्रकाची सॉफ्ट कॉपी पाठविण्यात आली . शैक्षणिक प्रमाणपत्रांची अखंडता, सुरक्षितता आणि विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानावर



कुलगुरू डॉ.संजय सोनवणे

आधारित सुविधा देण्याच्या दिशेने एक महत्त्वाची वाटचाल करताना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने डिजिटल प्रमाणपत्रांसह विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र कुठूनही, केव्हाही व सुरक्षितरित्या उपलब्ध होण्यासाठी ब्लॉकचेन हे अद्ययावत तंत्रज्ञान स्वीकारले आहे. अशा प्रकारचे ब्लाकचेनवर आधारित टठ कोड असलेले तसेच सुरक्षित व कुठल्याही प्रमाणपत्रावरील मजकुरात बदल होऊ न शकणारे पदवी प्रमाणपत्र देणारे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरलेले आहे असे शिक्षण क्षेत्रातील जाणकार सांगतात. विद्यार्थ्यांच्या डीजीटल वॅलेटमध्ये सदर प्रमाणपत्र कायमस्वरूपी उपलब्ध असणार असून विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राची मूळ प्रत मुलाखतींसाठी बाळगण्याची आवश्यकता नाही. या पदवी प्रमाणपत्राची वैधता नियोक्त्यांना व विविध एजन्सींना ऑनलाईन तपासण्यासाठी उपयुक्त ठरणार असून, सदरची प्रक्रिया ही पेपरलेस स्वरूपाची असणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची पदवी पडताळणी काही सेकंदामध्ये मानवी हस्तक्षेपाविरहित वेळेत व सुलभ होणार आहे. सदर कार्यप्रणाली ही कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली, परीक्षा नियंत्रक डॉ. भटूप्रसाद पाटील यांनी कार्यान्वित केली आहे. यापूर्वीही विद्यापीठाने टठ उेवश असलेली प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना वितरित केली होती. परंतु त्यातील पुढील टप्पा म्हणून इश्रेलज्ञ उहरळप वर आधारित असलेली प्रमाणपत्रे वितरित करण्याची प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहे. सामान्यत: डेटा हा एकाच सर्व्हरवर साठवला जातो. ज्यामुळे हॅकर्सना सर्व्हर हॅक करणे आणि त्यातील माहितीमध्ये बदल करणे सोपे होते. परंतु ब्लॉकचेनवरील डेटा वेगवेगळ्या ब्लॉक्समध्ये वितरीत केला जाऊन साखळीत बांधला जात असल्यामुळे सर्व्हर हॅक करणे व माहितीमध्ये बदल करणे अशक्य आहे. ब्लॉकचेन हे शैक्षणिक कागदपत्रे सुरक्षित करण्यासाठी जगातील सर्वात सुरक्षित तंत्रज्ञान आहे असे अभ्यासक सांगतात. या प्रक्रियेत प्रत्येक प्रमाणपत्रासाठी स्वतंत्र इश्रेलज्ञ उहरळप आधारित टठ कोड जनरेट होणार असून प्रमाणपत्रांवरील टठ कोड स्कॅन केल्यावर ते विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्रावरील तपशील तत्काळ उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांना मुलाखतींसाठी प्रत्यक्ष प्रमाणपत्रे बाळगण्याची गरज भासणार नसून पदवी प्रमाणपत्रावरील टठ उेवश हा नियोक्त्यांसोबत आणि सोशल मीडियावर शेअर करू शकतात. तसेच विद्यार्थी कधीही त्यांचे प्रमाणपत्र त्यांच्या डिजिटल वॅलेटमधून डाउनलोड करू शकतात. विद्यार्थी प्रमाणपत्रे सुरक्षित करण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी हा मुक्त विद्यापीठाच्या नाविन्यपूर्णतेसाठी सुरू असलेल्या वचनबद्धतेचा एक भाग असून यापुढील सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे या तंत्रज्ञानावर आधारित वितरित करण्याचा मानस आहे. असा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे विद्यापीठ म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभिमानास पात्र आहे.आणखीही नाविण्यपूर्ण व विद्यार्थी हिताचे उपक्रम राबविणारे विद्यापीठ म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ लौकिक प्राप्त दिशेने वाटचाल करीत आहे. या विद्यापीठाच्या नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा केलेला वापर विद्यार्थ्यांना आकर्षित करीत आहे. महाराष्ट्रातील सर्वात मोठे विद्यापीठ लवकरच वैश्विक पातळीवर भरारी घेण्यासाठी मार्गक्रमण करत असल्याचे विद्यार्थी व पालक सांगताहेत.



पब्लिक टॅग

डॉ.यशवंत घुमे

मो.९८२२२३३९१२

# ‘संकल्प से सिद्धी-मोदी सरकारचे ११ यशस्वी वर्ष’ कार्यशाळेला सिविल मंडळात उत्स्फूर्त प्रतिसाद

## भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार यांचे मार्गदर्शन; नगरसेविका छबुताई वैरागडे यांच्यावतीने संयोजन

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सिविल मंडळात भारतीय जनता पक्षाच्या वतीने संकल्प से सिद्धी - मोदी सरकारचे ११ यशस्वी वर्ष या विशेष उपक्रमांतर्गत मंडळ कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. चंद्रपूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार किशोर जोरगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या कार्यशाळेत भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, माजी महापौर राखी कंचर्लावार, भाजपा ज्येष्ठ नेते अरुण तीखे, नगरसेवक बंटी चौधरी, नगरसेविका वंदना तीखे, भाजपा माजी नगरसेवक व कार्यकर्ते, मंडळ प्रमुख, युवा मोर्चा व महिला मोर्चाच्या पदाधिकारी,कार्यकर्त्या आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यशाळेदरम्यान मोदी सरकारने गेल्या ११ वर्षांत राबविलेल्या महत्त्वाकांक्षी योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजना, उज्वला योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत, डिजिटल इंडिया, स्टार्टअप इंडिया यांसारख्या अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून देशात घडवून आणलेल्या मूलगामी बदलांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने विकासाचा नवा अध्याय लिहिला आहे. ग्रामीण व शहरी भागातील गरीब, महिला, शेतकरी, युवा अशा सर्वच घटकांसाठी क्रांतिकारी योजना राबवून त्यांच्या जीवनमानात लक्षणीय बदल घडवून आणण्यात आला आहे,असे उपस्थित मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले.कार्यशाळेदरम्यान कार्यकर्त्यांनी आपले अनुभव, सूचना आणि मत व्यक्त केली. या संवादामुळे कार्यक्रमाला एक ऊर्जावान व विचारमंथनाचा अविष्कार प्राप्त झाला. नगरसेविका छबुताई वैरागडे यांनी उपस्थित मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांचे विशेष आभार मानून समारोप केला. कार्यशाळेचे संयोजन नगरसेविका छबुताई वैरागडे यांनी केले, तर भाजप मंडळातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अथक मेहनत घेतली.




### योग दिनानिमित्त कृषी विद्यार्थ्यांकडून जनजागृती उपक्रम

# मजरा येथे ग्रामीण कृषी कार्यानुभवांतर्गत विद्यार्थी व ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग



**वरोरा । प्रतिनिधी**

२१ जून रोजी साजऱ्या करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, आनंदवन येथील ग्रामीण कृषी कार्यानुभवात सहभागी विद्यार्थ्यांनी मजरा गावात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले.

कार्यक्रमास गावातील सरपंच राकेशजी बोडे, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, जिल्हा परिषद शिक्षक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात योगाचे महत्त्व सांगणाऱ्या मार्गदर्शनाने झाली. त्यानंतर ताडासन, वृक्षासन, भुजंगासन आणि प्राणायामाचा सराव करण्यात आला. विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी योगाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी योगासने सादर करून प्रात्यक्षिक दाखविले.

योगाभ्यास व प्राणायामामुळे प्रतिकारशक्ती वाढून शरीरास ऊर्जा मिळते, हे या वेळी सांगण्यात आले. या शैक्षणिक भेटीत गौरी कामडी, दिशा कटरे, प्राजंली क्षिरसागर, पूर्वा लापकाले, श्रुती लिचडे, लक्ष्मी मडावी, मोनाली वंजारी या विद्यार्थीनी सहभागी झाल्या होत्या.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सरपंच राकेश बोडे, ग्रामपंचायत अधिकारी बी. पी. नरड,करुणा ढोके, सिम्पल ढोळे (अंगणवाडी सेविका) आणि इतर शिक्षकवर्गाचे विशेष सहकार्य लाभले. आनंद निकेतन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास पोतदार, ग्रामीण कृषी कार्यानुभवाचे प्रभारी डॉ. आर. के. महाजन, कार्यक्रम समन्वयक डॉ. राहुल तायडे आणि डॉ. मनोज जोगी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

# सुश्रद्धा सोशल वेल्फर फाउंडेशनकडून शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

### जागतिक योग दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांचा सन्मान



**माणगांव । प्रतिनिधी**

सेक्युलर एज्युकेशन ट्रस्ट व चंद्रकांत अधिकारी विद्यालय वडगाव येथे सुश्रद्धा सोशल वेल्फर फाउंडेशनच्यावतीने शालेय विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. जागतिक योग दिनानिमित्त आयोजित या समारंभास फाउंडेशनचे संस्थापक सुशांत मोरे व अध्यक्ष श्रद्धा मोरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

समारंभाची सुरूवात प्रमुख पाहुण्यांचा सन्मान करून झाली. संस्थापक सुशांत मोरे, अध्यक्ष श्रद्धा मोरे, राऊत , मराठे तसेच फाउंडेशनचे सदस्य भूषण जाधव, नाजिम मुकादम, संदेश मोरे, महेश हाटे, तेजस गोरेगावकर व प्रबुद्ध मोरे यांचा पुष्पगुच्छ व रोप देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गमरे यांनी केले तर सुशांत मोरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना भूषण जाधव यांनी म्हटले, विद्यार्थ्यांनी मोठे होऊन देशाचे आधारस्तंभ व्हावे.त्यांनी वह्यांचे महत्त्व सांगणारी कविता सादर केली. प्रमुख पाहुणे सुशांत मोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले, शिक्षण घेऊन आपल्या कुटुंबाचे, शाळेचे आणि देशाचे नाव उज्वल करा. परिस्थितीमुळे कधीच शिक्षणाचा त्याग करू नका, तर त्यावर मात करायला शिका. या देशाचे भवितव्य तुमच्या हातात आहे. बाबासाहेबांचे वाक्य आहे - शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.या वाक्याचा अर्थ लक्षात घेऊनच शिक्षणाचा अंगीकार करा.समारंभाचे सूत्रसंचालन शिंदे यांनी केले तर गमरे यांनी उपस्थित मान्यवरांचे विशेष आभार मानून समारोप केला.

# प्रशिक्षणाच्या माध्यमातून नागरिकांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या पूर परिस्थिती व इतर आपत्तींमध्ये नागरिकांनी कोणती दक्षता घ्यावी, या संदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि चंद्रपूर तालुका प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने लोहारा येथील तलावावर विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.



या प्रशिक्षणास अतिरिक्त जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार यांनी मार्गदर्शन केले. राज्य आपत्ती व्यवस्थापन दलाच्या तज्ज्ञांनी सीपीआर व आपत्तीसमयी घ्यावयाच्या खबरदारीबाबत प्रात्यक्षिक सादर करून नागरिकांना सविस्तर माहिती दिली.प्रशिक्षणाचा लाभ गावातील नागरिक, पोलीस पाटील, शासकीय कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचारी, सरपंच, तलाठी, मंडळ अधिकारी, कोतवाल, ग्रामसेवक, कृषी सहायक, आशा सेविका, आपदा मित्र-मैत्रिणी आणि पोहणारे नागरिक यांनी घेतला. या उपक्रमास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख व त्यांच्या चमूने सहकार्य केले. या प्रशिक्षणामुळे आपत्तीच्या काळात बचाव कार्यात नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**नागपूर । वैभव शहाणे**

तथागत बहुद्देशीय संस्था व मैत्रेय संघाच्या सहकार्याने, वस्तू व सेवाकर विभाग, महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम नुकताच लाँग मार्च चौक, ग्रेट नाग रोड येथे पार पडला.कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून सामाजिक न्याय विभागाचे प्रादेशिक उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड, वस्तू व सेवाकर विभागाचे सहायक आयुक्त प्रशांत मुंद्रे, विद्यार्थी मित्र आशिषभाऊ फुलझेले तर अध्यक्ष म्हणून वस्तू व सेवाकर विभागाचे राजू गायकवाड उपस्थित होते.

आशिषभाऊ फुलझेले यांनी शिक्षणासंबंधी विविध कोर्सेस व अभ्यासक्रमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड यांनी सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची माहिती देत जात प्रमाणपत्र व जात वैधता संदर्भात मार्गदर्शन केले. सहायक आयुक्त प्रशांत मुंद्रे यांनीही विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. अध्यक्ष



राजू गायकवाड यांनी नागपूर शहरात शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या सकारात्मक बदलांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष शुभम ढेंगरे यांनी केले तर संचालन मेघा सहारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्लोक जगदीश, वृषभ सहारे, श्वेत वागदे, साहिल धाबर्डे, राहुल जगदीश, निहाल इंगोले, यश ढेंगरे, मंथन गजभिये, चिकू शेंडे, सरनम माटे, सचिन वागदे, सम्यक शेंडे, सुधांशू पाटील, वेद जगदीश, अंकित जगदीश, विधान ढेंगरे यांनी अथक परिश्रम घेतले.

# मानसिक संतुलनासाठी योगाचा आधार घ्यावा : डॉ.समय बनसोड

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

जगभरात वेगाने होणाऱ्या प्रगतीबरोबरच माणसाच्या जीवनशैलीत आणि खानपानाच्या सवयीत होणाऱ्या बदलांमुळे मानसिक अस्वस्थता वाढत आहे. म्हणूनच, शारीरिक सशक्ततेबरोबरच मानसिक समतोल साधण्यासाठी योगाचा आधार घ्यावा लागतो, असे मत नागपूर येथील मानस उद्योग समुहाचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन सदस्य डॉ. समय बनसोड यांनी व्यक्त केले.ते पतंजली परिवार हिंगणघाट व अभिनव विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जे. आर. निखाडे लॉन व सभागृहात भारत सरकार आयुष मंत्रालयाच्या मार्गदर्शनानुसार आयोजित योग, प्राणायाम व मोफत आरोग्य तपासणी शिबिराच्या समारोप कार्यक्रमात बोलत होते. डॉ. बनसोड म्हणाले, योग केवळ शारीरिक समृद्धीसाठीच नव्हे तर मानसिक समतोल साधण्यासाठी आवश्यक आहे. उच्चपदस्थ अधिकारी, खेळाडू आणि इतर अनेक जण आज एकाग्रता, मानसिक समतोल आणि लक्ष केंद्रित ठेवण्यासाठी योगाचा आधार घेत आहेत. योग ही भारताची जगाला दिलेली अमूल्य देणगी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरात या देणगीचा प्रचार केला आहे.

यावेळी समुद्रपूर तहसीलचे उपविभागीय अधिकारी विलास नरवटे, नगरपरिषद हिंगणघाटचे माजी नगराध्यक्ष प्रेम बसंतानी, नारायण मित्र परिवाराचे अध्यक्ष महेश अग्रवाल, माजी नगरसेविका छाया सातपुते उपस्थित होते.डॉ. बनसोड पुढे म्हणाले, योग हे शास्त्र आहे जे व्यक्तिगत आत्म्याला परमात्म्याशी जोडण्याचा मार्ग दाखवते. १७७ देशांनी योगाला पाठिंबा दिल्यानेच योगामुळे जगभरात चमत्कार घडून आला आहे. जग आपली कुटुंब व्यवस्था अभ्यासून पाहते आणि आदराने पाहते. हिंगणघाटमधील पतंजली परिवार व अभिनव विचार मंच सलग ३६५ दिवस लोकांच्या जीवनाचा विकास घडविण्यासाठी प्रयत्नशील आहे, याचा मला अभिमान आहे.उपविभागीय अधिकारी विलास नरवटे यांनी सांगितले की, योगा लोकांना त्यांच्या जीवनाचा समतोल साधण्यासाठी व शारीरिक-मानसिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी प्रेरणा देतो. या प्रसंगी शिक्षक रणजीत जीवने यांचा 'योग रत्न पुरस्कार २०२५' ने सन्मान करण्यात आला. ओमसाई, गौरक्षण, शिवराय गार्डन, बिडकर वार्ड, पटवारी कॉलनी, हनुमान मंदिर शास्त्री वार्ड, निखाडे भवन, विवेकानंद योग कक्षा या योग कक्षांतील साधकांचा सन्मान करण्यात आला.पाच दिवस चाललेल्या या शिबिरात योग शिक्षक विजय धात्रक, राहुल वंजारे, पौर्णिमा धात्रक, प्राची पाचखेडे, रणजीत जीवने, छाया दविले, शीतल राऊत, नीता दरवरे, सुषमा खोडे, वर्षा काठुके आणि सुनीता गंगवार यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन अभिनव विचार मंचचे अध्यक्ष नितीन सुकळकर यांनी तर आभार प्रदर्शन योग शिक्षक विजय धात्रक यांनी केले. या शिबिरास योग शिक्षक व साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# ब्रिलियंट स्कूल हिंगणघाट येथे योग दिन उत्साहात साजरा

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विद्या विकास शिक्षण संस्था संचलित ब्रिलियंट स्कूल, हिंगणघाट येथे 'आंतरराष्ट्रीय योग दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अभय दांडेकर उपस्थित होते.योग दिनानिमित्त अध्यक्षीय मनोगतातून अभय दांडेकर यांनी सर्वांना निरोगी जीवनासाठी योगाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी म्हटले की, दैनंदिन जीवनात नियमित योगासने करणे केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक स्वास्थ्यासाठीदेखील आवश्यक आहे.

यावेळी शाळेतील सर्व शिक्षिका, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विविध योगासने सादर करून त्यांच्या महत्त्वाचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका विद्या मुंगले यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षिका जया निखाडे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकवर्गामध्ये 'योगाद्वारे सुदृढ जीवन' हा संदेश अधिकच रुजविला गेला.




योग दिनानिमित्त अध्यक्षीय मनोगतातून अभय दांडेकर यांनी सर्वांना निरोगी जीवनासाठी योगाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी म्हटले की, दैनंदिन जीवनात नियमित योगासने करणे केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक स्वास्थ्यासाठीदेखील आवश्यक आहे.यावेळी शाळेतील सर्व शिक्षिका, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी विविध योगासने सादर करून त्यांच्या महत्त्वाचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका विद्या मुंगले यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षिका जया निखाडे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी सहकार्य केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकवर्गामध्ये योगाद्वारे सुदृढ जीवन हा संदेश अधिकच रुजविला गेला.

# साने गुरुजी प्राथमिक शाळेत उत्साहात साजरा झाला आंतरराष्ट्रीय योग दिन

**वर्धा । प्रतिनिधी**

स्थानिक साने गुरुजी प्राथमिक शाळा, यशवंतनगर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास रमाविलास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक झाडे, सचिव अजय झाडे, शाळेचे मुख्याध्यापक विनोद ताकसांडे, योगशिक्षिका सरिता लोणकर व जयश्री लोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

योगप्रशिक्षिका सरिता लोणकर व जयश्री लोडे यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने करून दाखविली. विद्यार्थ्यांकडून प्राणायाम, अनुलोम-विलोम, कपालभाती, ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, दंडासन, अर्धचक्रासन, त्रिकोणासन अशा विविध योगप्रकारांचा सराव करून घेतला. या वेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना योग दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. शालेय गीतमंचाच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर



गीते सादर केली.

कार्यक्रमाचे संचालन संदीप चिचाटे यांनी केले तर आभार अर्चना सावनकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनोद ताकसांडे, राजेंद्र पंधरे, संदीप चिचाटे, अर्चना सावनकर, चेतना मोहोड, वंदना भोयर, चंद्रकला सोनटक्के यांनी सहकार्य केले.

# मदनीत ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम उत्साहात संपन्न

**वर्धा । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी मेघे (वर्धा) तर्फे २०२५-२६ साठी 'ग्रामीण जागरूकता कार्यानुभव' कार्यक्रमांतर्गत मदनी (दिंदोडा) येथे विविध लोकसहभागी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या कार्यक्रमाची सुरुवात २० मे २०२५ रोजी झाली असून रविवार, १५ जून रोजी दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

कार्यक्रमात दही, लोणी, व्हे, पनीर, खवा, पेढे, कुल्फी, बासुंदी, श्रीखंड अशा पारंपरिक पदार्थांच्या निर्मितीद्वारे व्यवसाय कसा वाढवता येईल, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सहभागी महिला बचत गटाच्या प्रतिनिधींना दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन,



पॅकेजिंग, वाहतूक आणि विक्रीविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.कार्यक्रमाला महिला बचत गटाच्या अध्यक्षा रुपाली गजानन तेलंगे, उपाध्यक्षा वैशाली अवधूत आणि सचिव सौ. रंजना कुडमेते यांच्यासह ग्रामीण महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्नेहल देशमुख, विषयतज्ज्ञ डॉ. प्रियांका हिरोळे, समन्वयक राजेंद्र खर्चे, कार्यक्रम अधिकारी डॉ. मंगेश घोडे आणि डॉ. कविता चोपडे यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थिनी जान्हवी खडसे, रूची गायधने, गायत्री कोहपरे, प्रांजल कडुकर, तनस्वी नीळ यांनी सक्रिय सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थीनींनी गावकऱ्यांना भविष्यातही अशा उपक्रमांत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# बजाज कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतला कृषी उत्पन्न बाजार समितीत शैक्षणिक अनुभव

**वर्धा । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न बजाज कृषी महाविद्यालय, पिपरी (मेघे) येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात आलेल्या ग्रामीण कृषी कार्यानुभव (RAWE) कार्यक्रमांतर्गत वर्धा कृषी उत्पन्न बाजार समितीत शैक्षणिक दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. या दौऱ्याचा उद्देश विद्यार्थ्यांना बाजार समितीचे कामकाज, व्यापारी व्यवहार व शेतमालाच्या विक्री प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती देणे हा होता. विद्यार्थ्यांनी बाजार समितीत शेतमालाचे वर्गीकरण, वजन प्रक्रिया, बोली प्रक्रिया, हमी भावाचा उपयोग, व्यापाऱ्यांचे व्यवहार व बाजार शुल्काच्या वसुलीसंबंधी सविस्तर माहिती घेतली. यासोबतच बाजार समितीचे कार्यकारी अधिकारी, बाजार निरीक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून




बाजार व्यवस्थेचे कामकाज, सरकारी योजनांची माहिती, शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण व अन्न सुरक्षा कायद्याबाबत मार्गदर्शन केले.हा शैक्षणिक दौरा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. स्नेहल देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ठ-थए कार्यक्रम समन्वयक राजेंद्र खर्चे, विषयतज्ज्ञ डॉ. कविता चोपडे व प्रकल्प प्रभारी डॉ. मंगेश घोडे यांच्या सहकार्याने राबविण्यात आला. या दौऱ्यात रुची गायधने, जान्हवी खडसे, प्रांजल कडुकर, गायत्री कोहपरे, तनस्वी नीळ या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## वायफड येथे 'विकसित भारत संकल्प सभा'

# सुनील गफाट यांनी मांडला मोदी सरकारचा विकासाचा लेखाजोखा




**वर्धा । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला ११ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सेवाग्राम मंडळाच्या वतीने वायफड येथील श्रीराम मंदिरात 'विकसित भारत संकल्प सभा' आयोजित करण्यात आली. या सभेचा उद्देश केंद्र सरकारने गेल्या ११ वर्षांत राबविलेल्या सेवा, सुशासन आणि गरीब कल्याणाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे हा होता.

माजी अध्यक्ष भाजपा वर्धा जिल्हा सुनील गफाट यांनी प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मोदी सरकारने मागील ११ वर्षांत केलेल्या महत्त्वपूर्ण विकासकामांचा लेखाजोखा सादर केला. या वेळी माजी अध्यक्ष नंदकिशोर झोटिंग, सेवाग्राम मंडळ अध्यक्ष गौरव गावंडे, दहेगाव स्टेशन सरपंच राजश्री गावंडे, तालुका महामंत्री गजानन दुतारे, प्रमोद चव्हाण, फुलचंद बोरकर, अरुण डुकरे, किशोर नाले, सुरेश तुमडाम, दिलिप रेवतकर, स्वप्निल बैस, अरुण बावणे, प्रशांत फुलकरी, वैभव चौधरी, शिवम चिखलकर, आदित्य गावंडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ, कार्यकर्ते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

# 'मुख्यमंत्री चषक' अंतर्गत नागपूरमध्ये अखिल भारतीय U-15 राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे दमदार उद्घाटन




**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर येथील विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर येथे मुख्यमंत्री चषक अंतर्गत अखिल भारतीय ण-१५ राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या विशेष समारंभास महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.देशभरातून आलेल्या युवा कुस्तीपटूंनी आपल्या दमदार खेळाने आणि जोशपूर्ण सादरीकरणाने उपस्थितांची वाहवा मिळवली. उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात म्हटले, कुस्ती हा भारतीय पारंपरिक खेळाचा आत्मा आहे. या खेळामुळे शारीरिक व मानसिक विकासासह राष्ट्रनिर्मितीची भावना मजबूत होते. मुख्यमंत्री चषक स्पर्धा नवोदित कुस्तीपटूंसाठी राष्ट्रीय स्तरावर चमकण्याचे एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ आहे.

या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांतील ण-१५ वयोगटातील सर्वोत्तम कुस्तीपटूंचा समावेश आहे. विविध वजनगटांमध्ये होणाऱ्या सामन्यांतून भारतीय कुस्ती क्षेत्राला नवीन दमदार खेळाडू मिळतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.समारंभास माजी खासदार रामदास तडस, राज्याचे राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मंत्री पंकज भोयर, आमदार संदीप जोशी, क्रीडा क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी, प्रशिक्षक आणि खेळाडूंचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री चषक ही स्पर्धा केवळ एक खेळ नसून युवकांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण आणि देशभक्तीचा संस्कार रुजवणारी प्रेरणादायी चळवळ आहे, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

# बोपापुर येथे वंध्यत्व निवारण शिबिरास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**वर्धा । प्रतिनिधी**

नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड आणि महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपूर अंतर्गत शुद्ध गवळाऊ वंशावळ निवड प्रकल्पाच्या वतीने बोपापुर (वाणी) येथे वंध्यत्व निवारण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात जनावरांच्या वंध्यत्वाच्या समस्या, खच्चीकरण, जंत निर्मूलन, खनिज मिश्रणाचे वाटप आणि गर्भ तपासणी करण्यात आली, ज्याचा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.

शिबिराचा शुभारंभ रत्नाकर कोंबे (पोलीस पाटील) यांच्या हस्ते गायीचे पूजन करून




करण्यात आला. निवृत्त पशुधन विकास अधिकारी व फिरते पशुवैद्यकीय दवाखाना देवळीचे डॉ. नामदेव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमोद लोहकरे, आशिष दिघीकर, आदित्य हिंगे आणि विजय डोंगरे यांनी जनावरांवर उपचार केले.बोपापुर परिसरातील पशुपालकांचा या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराचे आयोजन विजय डोंगरे यांनी आशिष दिघीकर यांच्या सहकार्याने केले. या उपक्रमामुळे स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या जनावरांच्या आरोग्यविषयी आवश्यक मार्गदर्शनासह उपचार मिळाले, त्यामुळे शिबिराचा समारोप समाधानकारक वातावरणात पार पडला.

# योग ही जगाला भारताची देण-संजय गाते

**पुलगाव । प्रतिनिधी**

योग ही जगाला भारताची देण आहे. नियमित योगाभ्यासाच्या माध्यमातून आपण निरोगी व निरामय जीवन जगू शकतो. योगामुळे शरीरासह मन आणि मेंदूवर ताबा मिळविण्यासही मदत होते. संयमित व शांत जीवन जगण्यासाठी नियमित योगाभ्यास आवश्यक आहे. जागतिक योग दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने नियमित योगाभ्यास व प्राणायामाचा संकल्प करावा,असे आवाहन भारतीय जनता पक्षाचे वर्धा जिल्हाध्यक्ष संजय गाते यांनी केले.

जागतिक योग दिनाच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी पुलगाव शहर व पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक गुरुनानक मंगल कार्यालय येथे योग शिबिराचे




आयोजन करण्यात आले. या शिबिरास भाजपाचे वर्धा जिल्हाध्यक्ष संजय गाते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. या वेळी पतंजली योग समिती, आर्ट ऑफ लिव्हिंग, मातृसेवा मंडळ, सेवा फाऊंडेशन, कलाविष्कार मंडळ, श्री संकटमोचन हनुमान मंदिर, समरसता मंच, छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती, गुरुदेव सेवा मंडळ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्या पदाधिकाऱ्यांसह पुलगाव शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपाचे शहराध्यक्ष प्रशांत इंगोले, मंगेश झाडे, राजेश गुप्ता, प्रवीण सावरकर, रिचर्ड क्रॉस, संदीप बोरकुटे, अनिल लेकुरवाले, गणेश येदबान, मानसिंग झांजोटे, गुंजन चव्हाण, सुरज सुरस्कार, रुपेश जोशी, अविनाश भोपे, अरविंद हलमारे, सुरेश मस्के, राजीव जयस्वाल, ॲड. अजय तिवारी, महेश आहूजा, श्रवण मंडले, नंदा देव्हारे, ममता निकम, अरविंद उगले, नलिनी ढोबळे, हरबन्स सतीजा, शोभा सतीजा, अवधूत मोने, प्रमोराव बमनोटे यांनी सहकार्य केले.

# योगाच्या माध्यमातून साध्य होतो मानवाचा शारीरिक मानसिक व आध्यात्मिक संगम-पालकमंत्री डॉ.उईके



**चंद्रपूर । प्रतिनिधी**
धावपळीच्या आणि तणावग्रस्त जीवनशैलीमुळे आज अनेकजण विविध व्याधींनी ग्रासले आहेत. या समस्या दूर करून निरोगी व समतोल जीवन जगण्यासाठी दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करणे आवश्यक आहे. योग हा केवळ व्यायाम नसून तो मानवाचा शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक संगम घडवतो, असे मत राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी व्यक्त केले.चंद्रपूर जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मेरा युवा भारत आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित मुख्य शासकीय योग दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे, उपविभागीय अधिकारी संजय पवार, तहसीलदार विजय पवार, जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश पुंड, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, शिक्षणाधिकारी राजेश पाताळे, अश्विनी सोनवणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिना साळुंके, सुभाष कासानगोट्टूवार आदी उपस्थित होते

कार्यक्रमाचे संचालन मंगला घोगी आसुटकर यांनी केले. या शासकीय योग दिनाच्या आयोजनास जिल्हा प्रशासनासह क्रीडा विभाग, पतंजली योग समिती आणि इतर संघटनांनी सहकार्य केले. या समारंभाने उपस्थितांच्या मनात योग साधनेविषयी नवचैतन्याचा अंकुर घडविला आहे.

### एक पृथ्वी, एक आरोग्य- २०२५ ची थीम

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतूनच संयुक्त राष्ट्र संघटनेने २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या ११ वर्षांत जगातील १७७ देशांत हा दिवस साजरा करण्यात आला आहे. २०२५ साठी 'एक पृथ्वी, एक आरोग्य' ही थीम जाहीर करण्यात आली आहे. पालकमंत्री डॉ. उईके यांनी या कार्यक्रमाचा संदर्भ देत पुढील वर्षापासून शासकीय योग दिन खुल्या मैदानात आयोजित करण्याच्या सूचना दिल्या.

### आसनांच्या सादरीकरणाने कार्यक्रमास मिळाली शोभा

कार्यक्रमाच्या सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. योगशिक्षिका वैजंती गौरकर आणि कविता मंघानी यांनी उपस्थितांना कपालभाती, अनुलोमविलोम, भ्रमारी प्राणायाम, वज्रासन, स्कंदचक्र, ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, दंडासन, अर्धचक्रासन, अर्धहलासन, शवासन अशा विविध आसनांची प्रात्यक्षिके सादर केली. या वेळी जिल्ह्यातील मान्यवरांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### चांगले आयुष्य घडविण्यासाठी योग आवश्यक- आमदार किशोर जोरगेवार

आमदार किशोर जोरगेवार म्हणाले, भारताचा योगाचा वारसा अनादी काळापासून आहे. कोणत्याही आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि मानसिक शांती साधण्यासाठी योगाचा अवलंब आवश्यक आहे. चांगले आयुष्य घडविण्याचा मूलमंत्र म्हणजेच नियमित योग साधना आहे.

# तुम्हीच सांगा साहेब,आम्ही शेतात जायचं कसं?

## वडगाव रासाई परिसरातील शेतकऱ्यांचा सवाल
## वडगाव रासाई पुलामुळे शेतकऱ्यांचा रस्ताच बंद




**शिरूर । रमेश बनसोडे**
वडगाव रासाई परिसरात बेडकी नाल्यावर नव्याने बांधण्यात आलेल्या पुलामुळे शेतकऱ्यांचा पारंपरिक रस्ताच बंद झाला आहे. या पुलाचा खर्च कोट्यवधी रुपये आहे, जो वाहतुकीसाठी उपयोगी आहे, मात्र शेतकरी व स्थानिक नागरिकांसाठी तोच अडचणींचं कारण ठरला आहे. पुलाच्या दोन्ही बाजूला सेवा रस्ता न केल्याने शेतकऱ्यांना शेतात जाता येत नाही, तर रुग्ण, विद्यार्थी आणि नागरिकांच्या दैनंदिन प्रवासावरही मोठा परिणाम झाला आहे.स्थानिक शेतकरी गणेश रत्नपारखी म्हणाले, आमचं शेत जवळ आहे, पण आता ते गाठणं अशक्य आहे. रस्त्याचा पर्यायच नसल्याने शेतमाल शेतातच सडून जात आहे. ट्रॅक्टर रस्त्यापर्यंत पोचू शकत नाही, ना शेतीत खत घालता येत आहे.

उद्धव ढवळे, देविदास भापकर, विठ्ठल शितोळे आणि इतर शेतकऱ्यांनी तहसीलदार कार्यालयात या संदर्भात तक्रार अर्ज दिला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार पुलाच्या बांधकामात सेवा रस्त्याचा समावेशच करण्यात आला नाही. त्यामुळे केवळ शेतकरीच नव्हे तर रुग्ण, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांना या पुलामुळे त्रास सहन करावा लागत आहे.शेतकऱ्यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की लवकरात लवकर सेवा रस्ता उपलब्ध करून दिला नाही तर ते आंदोलनाचा मार्ग अवलंबतील. जर प्रशासनाने लवकर निर्णय घेतला नाही तर आम्हाला आत्मदहनाशिवाय पर्याय राहणार नाही, असे शेतकऱ्यांनी सांगितले आहे.वडगाव रासाई पुलाचा उद्देश जरी विकासाचा असला तरी तो स्थानिक शेतकऱ्यांच्या जगण्याचा रस्ताच अडवणारा ठरला आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे, अन्यथा या समस्येचे रुपांतर मोठ्या जनआंदोलनात होऊ शकते.

# पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांच्या हस्ते सहा नवीन वाहनांचे लोकार्पण




**चंद्रपूर । प्रतिनिधी**
महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय प्रशासनाचा वेग वाढविणे आणि आपत्कालीन व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी राज्य शासनाने जिल्हा प्रशासनाला सहा नवीन वाहने उपलब्ध करून दिली आहेत. या सहा महिंद्रा बोलेरो न्युओ वाहनांचे लोकार्पण राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्या हस्ते करण्यात आले.

नियोजन भवन येथे आयोजित या समारंभास आमदार किशोर जोरगेवार, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अतिरिक्त जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, उपविभागीय अधिकारी संजय पवार, अजय चरडे, रविंद्र माने, तहसीलदार विजय पवार, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, जिल्हा नियोजन अधिकारी संजय कडू, सुभाष कासानगोट्टूवार आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयातील उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांच्या जुन्या वाहनांच्या बदल्यात नवीन वाहने खरेदी करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार सहा महिंद्रा बोलेरो न्युओ वाहने प्राप्त झाली असून ती चंद्रपूर, गोंडपिपरी, मुल, वरोरा येथील उपविभागीय अधिकारी आणि राजुरा व कोरपना येथील तहसीलदारांना देण्यात येणार आहेत. या नवीन वाहनांमुळे महसूल प्रशासनाचा कारभार अधिक वेगवान होईल आणि आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत पोहोचविण्यास सुलभता निर्माण होईल, असा विश्वास या कार्यक्रमात व्यक्त करण्यात आला.

# घोटाळ्याचा तपास गुन्हे अन्वेषण शाखे कडे सोपवा-भाजप शिष्टमंडळाची मागणी

## पीडितांना न्याय देण्यासाठी सखोल चौकशी करून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी



**मुल । प्रतिनिधी**
मुल शहरासह राज्यभर गाजत असलेल्या नोकरी घोटाळा आणि म्हाडा घोटाळ्यात गरीब जनतेचा कष्टाचा पैसा लुबाडणाऱ्या आरोपींची सखोल चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता पक्ष मुल शहराच्या शिष्टमंडळाने केली आहे.भाजप शिष्टमंडळाने पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांना प्रभारी ठाणेदार वंजारी यांच्यामार्फत निवेदन दिले आहे, तर या प्रकरणाचा तपास गुन्हे अन्वेषण शाखेकडे सोपविण्याची मागणी स्थानिक आमदार व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली आहे.

या घोटाळ्यात नाना आक्केवार आणि राजू पुद्दटवार हे मुख्य आरोपी म्हणून समोर आले आहेत. मात्र, या घोटाळ्याची व्याप्ती करोडो रुपयांची असून, अनेक पीडितांनी आपली शेती, घरे विकून किंवा नातेवाईकांकडून कर्ज घेऊन आरोपींच्या हवाली केले आहे. या घोटाळ्यात आणखी अनेक जणांचा समावेश असल्याचा अंदाज आहे.केवळ काही जणांनीच तक्रार केली आहे, तर अनेक पीडित अजून समोर येण्यास घाबरत आहेत. या घोटाळ्यात मोठा रॅकेट सक्रिय असल्याने सखोल चौकशी करून या महाठगांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.शिष्टमंडळात भाजपचे प्रवीण मोहूर्ले, मिलिंद खोब्रागडे, श्रीमती मनीषा गांडलेवार, जितेंद्र टिनगुसले, संतोष गाजुलवार, हर्ष गांडलेवार आणि पीडित कुटुंबीय उपस्थित होते.

# प्रासोल केमिकल्सतर्फे आमशेत आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन




**महाड । प्रतिनिधी**
प्रासोल केमिकल्सने कारखान्याचे मॅनेजिंग डायरेक्टर निषीद शहा यांच्या जन्मदिनानिमित्त आमशेत येथे एकदिवसीय आरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिरामध्ये कर्करोगासह विविध आजारांच्या चाचण्या करण्यात आल्या, ज्याचा लाभ आमशेत आणि परिसरातील नागरिकांनी घेतला.

शिबिरामध्ये टाटा हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टर्स आणि वैद्यकीय पथकाने नागरिकांची सखोल तपासणी करून महत्त्वाच्या आरोग्यविषयक मार्गदर्शनासह कॅन्सर संबंधित चाचण्या केल्या. या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांना त्यांच्या आरोग्याची स्थिती जाणून घेण्यास आणि योग्य वेळी उपचार घेण्यास मदत झाली.प्रासोल केमिकल्सचे साईट हेड प्रसाद गायकर यांनी या शिबिराच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. त्यांनी सांगितले की, प्रासोल केमिकल्स आपल्या सामाजिक उत्तरदायित्वाचा हिस्सा म्हणून अशा उपक्रमांना कायमच प्राधान्य देते.कार्यक्रमास प्रासोल केमिकल्सचे वरिष्ठ अधिकारी किरण म्हामुणकर, ऋषिकेश साहू, गावातील प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक ग्रामस्थांनी या आरोग्य शिबिराचे स्वागत करून प्रासोल केमिकल्स व टाटा हॉस्पिटलच्या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक केले. या उपक्रमामुळे स्थानिक परिसरात आरोग्यविषयक जनजागृती वाढल्याचे दिसून आले आहे.

# शारीरिक तंदुरुस्ती प्रमाणपत्रासाठी आलेल्या तरुणीचा डॉक्टरकडून विनयभंग

**मोहोळ तालुक्यातील शिरापुर (सो) प्राथमिक आरोग्य केंद्रातील घटना**

**मोहोळ । प्रतिनिधी**
शिरापुर (सो) येथील शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्रात शारीरिक तंदुरुस्तीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी आलेल्या तरुणीचा डॉक्टरकडून विनयभंग केल्याची घटना समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, २१ जून रोजी सकाळी सुमारे १० वाजता शिरापुर (सो) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शारीरिक तंदुरुस्ती प्रमाणपत्र मिळवण्यासाठी एक तरुणी गेली होती. त्या वेळी तेथे कार्यरत डॉक्टर अमित रमेश गायकवाड (वय ४२) यांनी तरुणीची तपासणी करताना तिच्या स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा आरोप आहे.घटनेनंतर तरुणीने मोहोळ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी डॉक्टर गायकवाड यांच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली आहे. या घटनेचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कर्णेवाड करत आहेत.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .